*वृ.वि. ११०९ २५ ज्येष्ठ, १९३३, शके (सायं.५.३० वा.)
दिनांक : १५ जून, २०११

**मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णय**

मुंबई, दि. १५: आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत पुढील निर्णय घेण्यात आले.

**मानव विकास कार्यक्रमाची व्याप्ती वाढवून**
**पहिल्या टप्प्यात १२५ तालुक्यात राबविणार**

मानव विकास मिशनने २००६ पासून राज्यातील १२ अतिमागास जिल्ह्यांतील २५ तालुक्यांमध्ये मानव विकास मिशन राबविले होते. या कार्यक्रमामध्ये मिळालेले यश लक्षात घेऊन यावर्षी राज्यातील निवडक १२५ तालुक्यांमध्ये मानव विकास कार्यक्रम राबविण्याचा निर्णय आज राज्य मंत्रिमंडळाने घेतला. मानव विकास कार्यक्रमावर आधारित हा कार्यक्रम सुधारित आणि विस्तारित स्वरूपात पुढील ५ वर्षांपर्यंत राबविण्यात येणार आहे. या कार्यक्रमांतर्गत शिक्षण, आरोग्य व बालकल्याण आणि उत्पन्नवाढीच्या योजना राबविण्यात येणार आहेत. प्रत्येक तालुक्यावर ३ ते ५ कोटी रुपये खर्च करण्यात येतील.

सन २००६ पासून राज्यातील सर्वात कमी मानव विकास निर्देशांक असलेल्या १२ जिल्ह्यांतील २५ तालुक्यांत प्रामुख्याने लोकांच्या शिक्षण, आरोग्य, उत्पन्नवाढ यात सुधारणा करण्यासाठी एकात्मिक प्रयत्न करण्याच्या दृष्टिकोनातून मानव विकास कार्यक्रम राबविला जात होता. या कार्यक्रमाच्या माध्यमातून राज्य शासनाकडून गेल्या ४ वर्षात २३५ कोटी रुपये खर्च करण्यात आले असून या कार्यक्रमाचे चांगले परिणाम दिसून आले आहेत.

या पार्श्वभूमीवर, कार्यक्रमाचे चांगले परिणाम लक्षात घेऊन मानव विकास ही संकल्पना जिल्ह्याऐवजी तालुका स्तरावर राबवून राज्यातील १२५ तालुक्यांमध्ये राबविण्याचा शासनाचा मानस होता. त्यानुषंगाने " मानव विकास कार्यक्रमाची व्याप्ती वाढविणे व मानव विकासावर आधारित योजना राबविणे " या विषयाबाबत मंत्रिमंडळाच्या आज दि. १५ जून, २०११ रोजीच्या बैठकीत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले :-

I) **सन** २००१ च्या जनगणनेनुसार तालुक्यातील स्त्री साक्षरतेचे प्रमाण व सन २००२ च्या सर्वेक्षणानुसार ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांचे प्रमाण या दोन निर्देशांकाच्या आधारे १२५ तालुक्यांची निवड करण्यात यावी. ही निवड एक वर्षाकरिता असावी. मानव विकास निर्देशांकाची निश्चिती करण्याबाबत शासन निर्णय, नियोजन विभाग, क्र. ममावि-२०११/ प्र.क्र.२१ /का.१४१८, दि. १३ एप्रिल २०११ अन्वये यशदा या संस्थेची नेमणूक केली आहे. त्याचा अहवाल आल्यावर तालुक्यांच्या निवडीत यथोचित सुधारणा करण्यात येईल.

II) **उक्त** निकषाप्रमाणे निवडण्यात आलेल्या १२५ तालुक्यांमध्ये खाली दर्शविलेल्या योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली.

**शिक्षण**

१. इयत्ता १० वी आणि १२ वी मध्ये अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांकरिता विशेष शिकवणी वर्ग सुरु करणे.
२. मोठ्या गावातील माध्यमिक शाळांत अभ्यासिका सुरु करण्यासाठी सोलार लाईट व फर्निचर / पुस्तके पुरविणे.
३. ग्रामींण भागातील सर्वच मुलींना इ. १२ वी पर्यंत शिक्षण घेणे शक्य व्हावे याकरिता गाव ते शाळा यादरम्यान वाहतुकीची सुविधा उपलब्ध करून देणे.
४. माध्यमिक / उच्च माध्यमिक शासकीय / अनुदानित शाळांमध्ये प्रयोगशाळांकरिता साहित्य पुरविणे
५. तालुक्याच्या ठिकाणी बालभवन - विज्ञान केंद्र स्थापन करणे.
६. कस्तुरबा गांधी बालिका योजनेची व्याप्ती इयत्ता १० वी पर्यंत वाढविणे.

**आरोग्य व बालकल्याण**

१. तज्ञ महिला डॉक्टरकडून गर्भवती महिलांची आरोग्य तपासणी करणे तसेच ० ते ६ महिने वयोगटातील बालकांची व मातांची तपासणी करणे आणि औषधोपचार करणे.

२. किशोरवयीन मुलींना आरोग्यविषयक बाबी व व्यवसाय कौशल्य विकसित करण्याबाबत प्रशिक्षण देणे.

३. अनु.जाती /अनु.जमाती / दारिद्य रेषेखालील बाळंत महिलेला बुडीत मजुरी देणे.

**उत्पन्नवाढीच्या योजना**

१. रेशीम कोष विकसित करण्याकरिता किटक संगोपन गृह बांधणे .

२. फिरती माती परीक्षण प्रयोगशाळा सुरु करणे.

३. ग्रामीण भागातील युवकांना स्वयंरोजगाराकरिता व्यवसाय कौशल्याचे प्रशिक्षण देणे.

४. स्वयंसहायता बचत गटाच्या माध्यमातून परसबाग / किचन गार्डन योजना राबविणे.

**III)** **सदर** कार्यक्रमांतर्गत राबवावयाच्या योजनांमध्ये आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार मा.मंत्री (नियोजन) यांना प्रदान करण्यात आले.

----------

## नाशिक येथील औष्णिक वीजनिर्मिती संचाच्या सुधारीकरण व आधुनिकीकरणास मान्यता

महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादितच्या नाशिक येथील औष्णिक वीजनिर्मिती केंद्रामधील संच क्रमांक-३ चे कार्यक्षम सुधारीकरण आणि आधुनिकीकरण करण्यास मान्यता देण्यात आली.

नाशिक येथील या संचाच्या आधुनिकीकरणासाठी एकूण ४८१.४६ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. त्यापैकी ३८५.१७ कोटी रुपये खर्च मे.के.एफ.डब्लू. या जर्मन वित्तीय संस्थेकडून कर्ज मिळणार असून उर्वरित ९६.२९ कोटी रुपये महाराष्ट्र शासन आपले भाग भांडवल म्हणून उपलब्ध करुन देणार आहे.

केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने (केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाचे प्रातिनिधिक कार्यालय) कार्यक्षम सुधारीकरण व आधुनिकीकरण कार्यक्रमासाठी देशभरातील ३४ संचांची निवड केली असून त्यात महाराष्ट्रातील ६ संचांचा समावेश करण्यात आला आहे. नाशिक येथील संच क्रमांक ३ हा त्यापैकी एक आहे.

यापूर्वी मार्च, २०११ मध्ये राज्य मंत्रिमंडळाने महानिर्मिती कंपनीच्या कोराडी येथील २१० मे.वॅ. क्षमतेच्या संच क्रमांक-६ च्या आधुनिकीकरण व नुतनीकरण कार्यक्रमास मान्यता दिली आहे.

नाशिक येथील हा संच सुमारे ३२ वर्षे जुना असून आधुनिकीकरणामुळे संचाचे आयुर्मान सुमारे २० वर्षांनी वाढून तो पूर्ण क्षमतेने वीजनिर्मिती करु शकेल. प्रदूषणाचे प्रमाण पूर्णपणे नियंत्रणात राहील आणि संचाची कार्यक्षमता वाढून त्यातील तांत्रिक बिघाडांचे प्रमाण देखील कमी होईल.

------------

## राज्यातील ७ नगरपालिकांच्या यात्राकर अनुदानात वाढ करण्याचा निर्णय

राज्यातील त्र्यंबक, आळंदी, जेजुरी, पंढरपूर, तुळजापूर, रामटेक आणि पैठण या नगरपालिकांच्या यात्राकर अनुदानात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला.

या ७ नगरपालिकांच्या क्षेत्रात महत्वाची यात्रास्थळे येतात. या यात्रास्थळांचे महत्व आणि त्या ठिकाणी भरणाऱ्या मोठमोठ्या यात्रा, त्याचबरोबर त्या ठिकाणी दररोज भाविकांची असणारी वर्दळ विचारात घेऊन

भाविकांना स्वच्छता, पाणीपुरवठा, आरोग्य, रस्ते, वीज आणि इतर मूलभूत सोयी सुविधा नगरपरिषदांना पुरवाव्या लागतात. परिणामी संबंधित नगरपरिषदांच्या मर्यादित उत्पन्नावर ताण पडत होता. २००४-०५ मध्ये वाढ करण्यात आलेल्या यात्राकर अनुदानास सुमारे ५ वर्षाचा कालावधी उलटून गेला होता. या कालावधीत सर्वसाधारण भाववाढ १०० टक्क्यांनी झालेली आहे. त्यामुळे विद्यमान यात्राकर अनुदानातून येणाऱ्या भाविकांना किमान सोयी सुविधा उपलब्ध करून देणे मर्यादित उत्पन्नाच्या अभावी या नगरपालिकांना शक्य होत नव्हते. यासाठी यात्राकर अनुदानाच्या रकमेत वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला.

या निर्णयानुसार त्र्यंबकेश्वर नगरपालिकेला पूर्वी १० लाख रुपये अनुदान देण्यात येत होते ते आता ५० लाख रुपये देण्यात येईल. आळंदी नगरपालिकेला पूर्वी १० लाख रुपये अनुदान देण्यात येत होते ते आता ६५ लाख रुपये देण्यात येईल. जेजुरी नगरपालिकेला पूर्वी १० लाख रुपये अनुदान देण्यात येत होते ते आता ७५लाख रुपये देण्यात येईल. पंढरपूर नगरपालिकेला पूर्वी एक कोटी रुपये अनुदान देण्यात येत होते ते आता दोन कोटी रुपये देण्यात येईल. तुळजापूर नगरपालिकेला पूर्वी ५० लाख रुपये अनुदान देण्यात येत होते ते आता एक कोटी ५० लाख रुपये देण्यात येईल. रामटेक नगरपालिकेला पूर्वी ५ लाख रुपये अनुदान देण्यात येत होते ते आता २५ लाख रुपये देण्यात येईल. पैठण नगरपालिकेला पूर्वी १६ लाख ५० हजार रुपये अनुदान देण्यात येत होते ते आता ५० लाख रुपये देण्यात येईल.

यात्राकर अनुदानात वाढ केल्यामुळे राज्य शासनावर ४ कोटी १३ लाख ५० हजार रुपयांचा वित्तीय भार पडणार आहे.

---------

## राज्यात आतापर्यंत २.१८ लाख हेक्टर क्षेत्रात पेरणी

राज्यात मोसमी पावसाचे आगमन ३ जून रोजी कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला तालुक्यात झाले असून ४ आणि ५ जून रोजी राज्यातील कोकण विभाग, पुणे, सातारा, कोल्हापूर, नाशिक आणि नंदूरबार या जिल्ह्यात पावसाला सुरुवात झाली. राज्यातील मराठवाडा आणि विदर्भात जूनच्या पहिल्या आणि दुसऱ्या आठवड्यात मान्सूनपूर्व पावसाची नोंद झाली. मात्र विदर्भ आणि मराठवाड्यात अद्याप मान्सूनचे आगमन झालेले नाही.

राज्यात आतापर्यंत २२१ मि.मि. पावसाची नोंद झाली आहे. राज्यातील ३५५ तालुक्यांपैकी ४१ तालुक्यांत अतिजोराचा, ३३ तालुक्यांत जोराचा, १११ तालुक्यांत मध्यम आणि १२३ तालुक्यांत अल्प स्वरुपाचा पाऊस झाला आहे. उरलेल्या ४७ तालुक्यात अद्याप पाऊस झालेला नाही.

### राज्यात रोपे टाकण्याचे काम सुरु

राज्यातील खरीप पिकाचे सरासरी क्षेत्र १३२.३४ लाख हेक्टर असून आतापर्यंत २.१८ लाख हेक्टर म्हणजेच एकूण क्षेत्राच्या २ टक्के क्षेत्रात पेरणी झाली आहे.

राज्यातील कोकण, कोल्हापूर आणि पुणे विभागात भात रोपवाटिकेवर रोपे टाकण्याचे काम प्रगतीपथावर आहे. नाशिक, कोल्हापूर, लातूर, अमरावती, आणि औरंगाबाद विभागात बागायती कापूस पेरणी झाली आहे. कोल्हापूर विभागात भात, सोयाबीन, भुईमूग आणि ज्वारी पिकाच्या पेरणीस सुरुवात झाली आहे. राज्यातील सर्व विभागात पेरणीपूर्व मशागतीची कामे सुरु आहेत.

### आतापर्यंत ४३ लाख मेट्रिक टन खत साठा मंजूर

राज्य शासनाने मागील पाच वर्षांतील खत वापर, बदलती पीक पध्दती, उपलब्ध सिंचन क्षमता आणि जिल्ह्याची मागणी याचा विचार करून चालू वर्षी ४६.३५ लाख मेट्रिक टन खताची मागणी केंद्र शासनाकडे केली होती. केंद्र शासनाने राज्याला ४३ लाख मेट्रिक टन खत साठा मंजूर केला आहे.

राज्याची एकूण बियाणांची गरज १८.३५ लाख क्विंटल असून एकूण उपलब्धता २०.५७ लाख क्विंटल आहे. आतापर्यंत १४.०२ लाख क्विंटल बियाणांचा पुरवठा झाला आहे. कापूस हे महाराष्ट्रातील महत्वाचे नगदी पीक आहे. त्याची लागवड प्रामुख्याने २६ जिल्ह्यांतील ३९ लाख हेक्टर क्षेत्रावर केली जाते. कापसाच्या एकूण क्षेत्रापैकी ९५ टक्के क्षेत्रावर बी.टी. कापसाची तर उर्वरित क्षेत्रावर देशी आणि सुधारित वाणांची लागवड करण्यात येते. राज्यात कापूस पिकाच्या क्षेत्रात सातत्याने वाढ होत आहे. चालू वर्षी ४५ लाख हेक्टर क्षेत्रावर बी.टी.कापूस पिकाची लागवड होईल असा अंदाज आहे. विविध बी.टी.कापूस उत्पादक आणि विक्रेत्या कंपन्यांनी राज्यासाठी लागणाऱ्या १८० लाख पाकीटांची विक्री केली असून पुरवठ्याची टक्केवारी १०० टक्के एवढी आहे.

----------